इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (४/२०२६)

विशेष सभा

---

प्रति. दि. ०२/०६/२०२६

मा. ---------------------------------------------------------------

नगरसेवक / नगरसेविका,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिकेची विशेष सभा शुक्रवार दि. ०५/०६/२०२६ रोजी दुपारी १२ : १५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

****************************************************************************************

**परिशिष्ठ**

विषय क्र. १ : घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ हे दि.०१ एप्रिल २०२६ पासून लागू झाले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १९ फेब्रुवारी, दि.२९ एप्रिल व दि.०५ मे २०२६ रोजी विविध निर्देश देऊन केंद्र सरकार, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश आणि शहर स्थानिक स्वराज्य संस्थांना नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही करणेचे आदेश दिलेले आहेत. या अनुषंगाने मा. सहसचिव तथा राष्ट्रीय अभियान संचालक, ( SBM नागरी ) यांनी दिनांक २९/०५/२०२६ चे पत्रान्वये जागतिक पर्यावरण दिनाच्या अनुषंगाने कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन करणेबाबत दिले निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत कार्यालयीन प्रस्तावाचा विचार करणे.

---

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. ०२/०६/२०२६ चे आदेशानुसार.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

( सुनिल भाऊ शिंदे ) 02.06.2026

प्र.नगरसचिव

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०४
सर्वसाधारण सभा

ठराव क्र.७२
दि. ०५/०६/२०२६

विषय क्र. १ : घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ हे दि.०१ एप्रिल २०२६ पासून लागू झाले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १९ फेब्रुवारी, दि.२९ एप्रिल व दि.०५ मे २०२६ रोजी विविध निर्देश देऊन केंद्र सरकार, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश आणि शहर स्थानिक स्वराज्य संस्थांना नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही करणेचे आदेश दिलेले आहेत. या अनुषंगाने मा. सहसचिव तथा राष्ट्रीय अभियान संचालक, ( SBM नागरी ) यांनी दिनांक २९/०५/२०२६ चे पत्रान्वये जागतिक पर्यावरण दिनाच्या अनुषंगाने कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन करणेबाबत दिले निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत कार्यालयीन प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

भारत सरकार, गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय (MoHUA) यांचेमार्फत जागतिक पर्यावरण दिन (WED-2026) हा "A Global Call for Climate Action" या संकल्पनेवर आधारित साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त दि. ०५ जून २०२६ ते १२ जून २०२६ या कालावधीत शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी, नागरिक, स्वयंसेवी संस्था, युवक गट व इतर भागधारकांना पर्यावरण संवर्धन, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व स्वच्छ भारत मिशन (SBM-U 2.0) बाबत जागरूक करण्यासाठी विशेष अभियान राबविण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत.त्यानुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत खालीलप्रमाणे उपक्रम राबविणे प्रस्तावित आहे.

**१.** दि. ०५ जून २०२६ – विशेष महासभा / परिषद बैठक

विशेष महासभा आयोजित करून खालील विषयांवर लोकप्रतिनिधी व संबंधित भागधारकांचे प्रबोधन करण्यात यावे.घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची माहिती.अनिवार्य ४ प्रकारे कचरा वर्गीकरण (4 Stream Source Segregation).प्रभागस्तरावर जनजागृती अभियानाचे नियोजन व अंमलबजावणी. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छता, कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया प्रकल्प व लेगेसी वेस्ट निर्मूलन याबाबत माहिती.

**२.** दि. ०६ जून २०२६ – अभ्यास भेट (Exposure Visit)

महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांसाठी खालील प्रकल्पांना अभ्यास भेट आयोजित करण्यात यावी.

१) कचरा प्रक्रिया केंद्रे, २) MRF सेंटर, ३) कंपोस्ट प्रकल्प. लेगेसी वेस्ट निर्मूलन स्थळे. ४) Reduce-Reuse-Recycle (RRR) केंद्रे. व इतर स्वच्छता व पर्यावरण विषयक प्रकल्प. यामुळे लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष अंमलबजावणीची माहिती मिळून नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यास मदत होईल.

**३.** दि. ०७ जून ते १२ जून २०२६ – जनजागृती, प्रबोधन व सामूहिक कृती सप्ताह

खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

अ) ४ प्रकारे कचरा वर्गीकरण व घरगुती कंपोस्टिंगचे प्रात्यक्षिक.

ब) सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता अभियान व Garbage Vulnerable Points (GVPs) निर्मूलन मोहीम.

क)"एक पेड़ माँ के नाम" अभियानांतर्गत स्थानिक व हंगामी वृक्षांचे वृक्षारोपण.

ड) बाजारपेठ, शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे येथे विशेष जनजागृती मोहीम.

इ) रहिवासी संघटना (RWAs), स्वयंसेवी संस्था (NGOs), युवक मंडळे, NSS, NYKS, NCC, बचत गट (SHGs) यांचा सहभाग.

फ)घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या अंमलबजावणीबाबत व्यापक प्रचार व प्रसिद्धी.

वरीलप्रमाणे जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त विशेष अभियान इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत राबविण्यास मान्यता देणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी जागतिक पर्यावरण दिन (WED-2026) हा "A Global Call for Climate Action" या संकल्पनेवर आधारित साजरा करणेच्या निमित्ताने दि. ०५ जून २०२६ ते १२ जून २०२६ या कालावधीत इचलकरंजी महानगरपालिका लोकप्रतिनिधी, नागरिक, स्वयंसेवी संस्था, युवक गट व इतर भागधारकांना पर्यावरण संवर्धन, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व स्वच्छ भारत मिशन (SBM-U 2.0) बाबत जागरूक करण्यासाठी विशेष अभियान राबविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : म. भि. हिंगमिरे.

अनुमोदक : प्र. ना. धुत्रे.

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner